# वाहनातुन/प्रवासादरम्यान होणा–या चो–या रोखण्यासाठी ध्यावयाची काळजी

1 पैशाची बॅग अथवा लॅपटॉप कारमध्ये सोडून जाऊ नका. शक्यतो या वस्तू कारच्या डिक्कीमध्ये ठेवा, जेणेकरुन त्या चोराच्या नजरेस पडणार नाहीत. ब–याचदा वाहनांच्या काचा फोडुन अशा बॅगांची/लॅपटॉपची चोरी होते.

2 तुमचे पैसे खाली पडले आहेत, तुमच्या गाडीचे ऑईल गळत आहे अथवा टायर पंक्चर झाला आहे, तुम्ही अपघात करून पुढे आला आहात असे बहाणे सांगुन तुमचे लक्ष विचलित करून तुमच्याकडील रोख रक्कम, लॅपटॉप व अन्य साधनांची चोरी केली जावु शकते.

3 प्रवासादरम्यान अनोळखी इसमास आपल्या वाहनात बसवु नका. ब–याच वेळेस शस्त्राचा धाक दाखवुन वाहन चालकास लुबाडण्याचे प्रकार घडतात. त्याचप्रमाणे, आपणास खाजगी वाहनात प्रवासी म्हणुन बसवुन नंतर लुबाडले जाते, यासाठी अनोळखी खाजगी वाहनातुन प्रवास टाळा.

4 अनोळखी सह–प्रवाशाने देवु केलेले कोणतेही खादयपदार्थ खावु नका. ब–याचदा त्यातुन गुंगीचे औषध देवुन आपली लुबाडणुक होवु शकते. गुंगीकारक पदार्थाच्या अतिमात्रेमुळे अनेक प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

5 प्रवासादरम्यान आपल्या मौल्यवान वस्तुची काळजी घ्या. यादरम्यान आपले साहित्य सतत नजरेसमोर ठेवा.

6 प्रवासादरम्यान बसमध्ये चढताना अगर उतरताना काही लोक जाणीवपुर्वक गर्दी करून आपल्याजवळील पैशाचे पाकीट, मोबाईल इत्यादी वस्तु चोरतात, याबाबत खबरदारी घ्या.